अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। मंगळवार, दि. २४ जून २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : २६५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## हल्ल्याचं कांड करण्याच्या हेतूने आलेल्या हल्लेखोरांवर आयुष्यात याद येईल, असे जबरी पोलिसांत गुन्हे दाखल

घोंगडे वस्ती परिसरात हल्ल्यांचं मोठं कांड करण्याच्या दृष्टीने इथला एक गट आला होता. या गटामधील मुख्य १४ आणि अन्य १० ते १५ लोकांवर जोडभावी पोलिस ठाण्यात दंगल घडविण्याचा प्रयत्न, हल्ल्यांचा घाट घालणे, अत्यंत धोकादायक शस्त्रे बाळगून इतरांच्या जीवाला इजा पोचवणे, बेकायदा जमाव जमवून गोंधळ घालून समाजमन भयभीत करण्यासह शांतता भंग करणे असे भारतीय न्याय संहिता १०९ ११८ एक ३३२ १८९ २८९ (४) १९१ २ १९१ ३९० ३५२ ३५१ २ ३२४ (४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ १३५ फौजदारी कायदा सुधारणा कायदा २०१३ सात या अन्वये गुन्हे दाखल झाले आहेत. ज्या गुन्ह्यांमुळे हल्लेखोरांना आयुष्यात याद येईल, असे ते गुन्हे आहेत. ज्याच्यामधून सहजासहजी सुटका होणं शक्यच नाही, असे कायदे तज्ज्ञांसह पोलिसांकडून सांगण्यात आले.

## चिट पाखरू दिसलं तरी इथल्या नागरिकांचे टवकारतात कान...



# @सोलापूर घोंगडे वस्ती भेदरलेलं समाजमन...



सोलापूर : घोंगडेवस्ती परिसरात रविवारच्या घटनेनंतर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस आणि जवानांचा असा तगडा बंदोबस्त तैनात आहे.

## तैनात बंदोबस्त... तणावपूर्ण शांतता...मात्र दहशत अन् भितीचे सावट कायम...

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

सोलापुरातील प्रसिद्ध घोंगडे वस्ती परिसरात मागच्या साधारण २० ते २५ वर्षांपासून दोन गटांमध्ये 'शीत'युद्ध सुरु होतं. याचा भडका रविवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उडाला. दोन्ही गट समोरासमोर भिडले. दोन्ही गटाकडून लाठ्या-काठ्यांसह वाद सुरु झाला. दोन्ही बाजूने दगडफेक झाली. बराच वेळ धुमश्चक्री झाली. वेळेत पोलिस दाखल झाले अन् जातीय दंगलीचा मोठा अनर्थ टळला. दरम्यान, या घटनेचे तीव्र पडसाद या परिसरात उमटले आहेत. कधी काय होईल? याचा काही नेम सांगता येत नसल्याची भावना इथल्या लोकांच्या मनामध्ये आहे. इथलं समाजमन अत्यंत भेदरलेलं आहे. या भागात अत्यंत तणावपूर्ण शांतता असली तरी नागरिक प्रचंड दहशत अन् भितीच्या सावटाखाली आहे. घटनेच्या पार्श्वभूमीवर, इथं प्रचंड मोठा बंदोबस्त तैनात असला तरी लोक भयभीत असल्याचं या ठिकाणी केलेल्या पाहणीतून आणि संवादामधून दिसून आलं.



सोलापूर : रविवारच्या धुमचक्रीनंतर घोंगडेवस्ती परिसरात सोमवारी रस्त्यांवर असा शुकशुकाट दिसून आला.

- हल्ल्याचं मोठं कांड करण्याच्या दृष्टीने तरुणांचा समूह आल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून निष्पन्न
- हातात काठ्या, चाकूसह तीक्ष्ण हत्यारे सोबत घेऊन आल्याचे सकृतदर्शनी उघड
- चौघा संशयित हल्लेखोरांच्या सोमवारी रात्री आवळल्या मुसक्या
- दुसऱ्या गटाकडूनही गुन्हे दाखल होणार असल्याची माहिती

### 'या' १४ संशयित हल्लेखोरांवर गुन्हे दाखल

सीजान कादिर मुल्ला, अदनान कादिर मुल्ला, अखीब सत्तार मुल्ला, इरफान इनामदार, युसुफ इनामदार, बादशाह इनामदार, इब्राहिम ऊर्फ ईब्या इनामदार, अमीर इनामदार, बाबा निसार शेख, अज्जू शेख, शाहिद शेख, सोहेल शेख, अरबाज मुलाणी.

### पोलिस म्हणाले, दोन्ही गटाचे काहीजण 'सिव्हील'मध्ये...

जोडभावी पोलिस ठाण्याच्या सूत्रांनुसार, या घटनेत सहभागी होण्यातून जखमी झालेले दोन्ही गटाचे साधारण ४-५ लोक सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल आहेत. त्यांच्यावर येथे उपचार सुरु आहेत.

## संशयित फरार...सीसीटीव्ही फुटेज ताब्यात...शोधासाठी पोलिस सक्रीय...

### तरूण हल्ले करण्याच्या हेतूनेच आले होते, सीसीटिव्ही फुटेजमधून समोर आले जळजळीत सत्य

खास करुन घोंगडे वस्ती परिसरात काल रात्री जी धुमश्चक्री झाली, त्यादरम्यान या भागातील एका गटाचे साधारण १८ हून अधिक तरुण हे हातात काठ्या, चाकू तसेच अन्य तीक्ष्ण हत्यारे तसेच दगडे घेऊन आल्याचे सीसीटीव्हीच्या फुटेजमधून आढळून आले आहे. त्यामुळे एका गटाकडून इथं मोठ्या हल्ल्याचं कांड करण्याच्यादृष्टीने तरुणांचा समूह आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत असल्याचे जोडभावी पोलिस ठाण्याच्या पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

इथल्या घटनेच्या अनुषंगाने, या परिसरातील दोन ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेण्यात आले असून त्याद्वारे अधिक माहिती पोलिस मिळवत आहेत. मात्र दोन्ही ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये एका गटाच्या तरुणांचा समूह हा हल्ले करण्याच्या हेतूनेच आला होता, हे स्पष्ट होत आहे.

### 'सिव्हील'मध्ये अशी नोंद...

रियाज दस्तगीर नदाफ (वय २१, घोंगडे वस्ती, सोलापूर) हा रविवारी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सुरेशअण्णा पाटील यांच्या घराजवळ थांबला असता, अज्ञात कारणाने बिपिन पाटील व इतरजणांनी मिळून चाकूने मारहाण केल्याने त्याच्या मानेस जखम झाल्याने त्यास उपचारास आज रोजी २३ वाजून दहा मिनिटे सिव्हिल हॉस्पिटल येथे मुजमिल पठाण यांनी दाखल केले, अशी नोंद नमूद आहे.

### एका गटाच्या तरुणांकडून 'हा' आक्षेपार्ह प्रकार सुरुच होताच...

- ✔ गटागटाने रस्त्यावर थांबून महिलांकडे पाहणे
- ✔ रस्त्यावर थांबून वाहतुकीस मुद्दामहून अडथळा करणे
- ✔ मुलींकडे वाईट हेतूने पाहणे, प्रसंगी इशारे करणे
- ✔ वाहन भरधाव वेगाने चालवणे
- ✔ मुद्दामहून वाहनांचे हॉर्न सलगपणे आणि मोठ्याने वाजवणे
- ✔ रागाने बघून अंगावर चाल करुन येण्याचा प्रयत्न करणे

### उपचारांमुळे संशयितांना ताब्यात घेण्यास अडचण

दगडफेक, मारहाण यामध्ये एका गटाचे जे संशयित दोषी आहेत, त्यांच्यावर सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. त्यामुळे त्यांना चौकशीसह पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात अडचण असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### दंगल घडविण्याच्या तयारीने आलेले संशयित फरार; जोडभावी पोलिसांकडून दोषींना ताब्यात घेण्याचे प्रयत्न

हातामधील शस्त्रांच्या साह्याने दंगलीसदृश्य मोठं करण्याच्या हेतुने आलेल्या एका गटातील संशयित हे काल रात्री घटना घडल्यापासून फरार झाले आहेत, त्यांच्या नातेवाईकांकडून त्यांचे मोबाईल नंबर मिळवून त्यांचे लोकेशन ट्रेस करण्याचे काम पोलिसांकडून सुरु आहे. चौघा संशयितांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्याची माहिती सोमवारी रात्री उशिरा मिळाली.

### डोळ्यात तेल घालून पोलिसांचे हालचालींवर बारीक लक्ष

रविवारच्या धुमचक्रीच्या अनुषंगाने, घोंगडे वस्ती परिसरात जोडभावी पोलिस ठाण्याचे स्थानिक पोलिस तसेच दंगा नियंत्रण पथक, शीघ्र प्रतिसाद पथक, एसआरफीच्या तुकड्या बंदोबस्तात तैनात आहेत. डोळ्यात तेल घालून पोलिसांचसह विविध पथकांचे इथल्या प्रत्येक हालचालींवर लक्ष आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तुम्हाला त्रास देण्याची आमची इच्छा नव्हती!

### बिपीन पाटील यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीचा संपादित भाग...



घोंगडेवस्तीमध्ये राहणारी मुलगी सबाइलियास मुल्ला हिच्याशी तिच्या घरच्यांच्या विरोधात जाऊन प्रेमविवाह केलेला आहे. त्यामुळे तिच्या घरातील व तिच्या भावकीतील लोक माझ्यावर चिडून आहेत. त्यांच्यापासून माझ्या जीवाला धोका आहे, यासंबंधीचा अर्ज मी जोडभावी पोलिस ठाण्यात दिलेला आहे.

दरम्यान, मी आणि माझा मित्र नवीन गोटीमुकुल आणि रवी मंदकल यांच्यासोबत घोंगडे वस्तीमधील सिद्ध गणेश मंदिर चौकात रविवारी रात्री १०:१५ वाजण्याच्या सुमारास बोलत उभे होतो. त्यावेळी माझ्या ओळखीचे इसम अफहान मुल्ला आणि रौफ आयुब इनामदार हे दोघे त्यांच्या मोटरसायकल स्कूटर वरून तिथून वेगाने जात होते. या वेळी येथे बरीच लहान मुले रस्त्यावर खेळत होती म्हणून मी त्यांना मोटरसायकल हळू घेण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी मला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आमच्यात वाद सुरु झाला, तेव्हा अफहान शेख आणि सैफ इनामदार यांनी फोन करून त्यांच्या इतर साथीदारांना बोलवून घेतले. त्यावेळी त्यांच्याकडून सीजान कादिर मुल्ला, अदनान कादिर मुल्ला, अखीब सत्तार मुल्ला, इरफान इनामदार, युसुफ इनामदार, बादशाह इनामदार, इब्राहिम ऊर्फ ईब्या इनामदार, अमीर इनामदार, बाबा निसार शेख, अज्जू शेख, शाहिद शेख, सोहेल शेख, अरबाज मुलाणी आणि इतर दहा ते पंधरा लोक तेथे पोचले. त्यांनी त्यांचा जमाव जमवून मला शिवीगाळ करून माझी कॉलर पकडून 'तुला आता खाल्लास करतो' असे म्हणून मला ठार मारण्याच्या उद्देशाने दगडाने आणि रोडने माझ्या डोक्यावरती मारले. त्यामुळे माझ्या डोक्यातून रक्तस्राव होऊ लागला. त्यावेळीला मी घराकडे पळालो असता या लोकांनी माझ्या घरात घुसून मला मारण्यास सुरुवात केली. त्यावेळी माझा भाऊ संदीप पाटील, विनायक पाटील हे दोघे भांडण सोडविण्यास आले असतात त्यांनाही या लोकांनी दगड मारून जखमी केले. यादरम्यान माझ्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन कुठेतरी पडून गहाळ झालेली आहे. दरम्यान आमच्या भांडणाची माहिती पोलिसांना मिळाल्याने त्या ठिकाणी पोलिस आले होते. त्यांनी आम्हाला पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले,तद्नंतर त्यांनी मला मेडिकल यादी देऊन सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार करता पाठवले. आम्ही उपचार घेऊन आज रोजी पोलीस ठाणे येथे तक्रार कामी आलो आहे.

संगम श्री डे
257-43-580

संगम श्री नाईट
369-83-139

कल्याण
159-53-247

मुंबई
237-20-578

प्रधान मंत्री आवास योजना-शहरी
Pradhan Mantri Awas Yojana-Urban

म्हाडा MHADA

# जाहीर नोटीस

प्रधानमंत्री आवास निर्माण योजना (शहरी) अंतर्गत
जगातील सर्वात मोठ्या ३०, ००० असंघटीत कामगारांसाठीचे गृहप्रकल्प

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व रे नगर च्या लाभार्थ्यांना सूचित करण्यात येते की, पंतप्रधान आवास योजना (शहरी) अंतर्गत बेघर लाभार्थ्यांना परवडणाऱ्या दरात, सहकार तत्वावर घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी रे नगर हाऊसिंग को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि., ता.दक्षिण सोलापूर. येथे ३०,००० असंघटीत कामगारांसाठी पथदर्शी आणि महत्वाकांक्षी गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात आलेला आहे.

यातील पहिल्या टप्प्यातील १५,०२४ घरकुलांचा लोकार्पण सोहळा दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या हस्ते पार पडलेला आहे.

सद्यस्थितीत ३१५० लाभार्थ्यांनी घरकुलाची संपूर्ण रक्कम अदा करून प्रत्यक्ष ताबा घेतलेला आहे. मात्र ११८७४ लाभार्थ्यांनी अद्याप ताबा घेतलेला नाही. त्यांच्याकडून बँक किंवा संस्थेकडे थकीत रक्कम भरायची आहे.

या अनुषंगाने दि. ०६/०५/२०२५ रोजी मा. पंतप्रधान कार्यालयाकडून पत्र प्राप्त झाले असून, त्यामध्ये उर्वरित लाभार्थ्यांनी तातडीने आपली थकीत देय रक्कम अदा करून घराचा ताबा घ्यावा, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. फेडरेशनतर्फे केंद्र व राज्य शासनाकडे थकीत रकमेच्या हप्त्यांकरिता तीन महिन्यांची मुदतवाढ मागितलेली आहे, मात्र शासनाकडून अद्याप कोणताही निर्णय अधिकृतपणे कळवलेला नाही.

म्हणून सर्व संबंधित लाभार्थ्यांनी संस्थेची व बँकेची थकीत देय रक्कमे तातडीने अदा करून घरकुलाचा ताबा घ्यावा. अन्यथा मा.केंद्र आणि राज्य शासनामार्फत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल आणि त्याची जबाबदारी संबंधित लाभार्थ्यांवर राहील, याची नोंद घ्यावी.

रे नगर हाऊसिंग को-ऑप सोसायटीज फेडरेशन लि., ता.दक्षिण सोलापूर.

मुख्य प्रवर्तक
कॉ.नरसय्या आडम (मास्तर)

चेअरमन
कॉ.सौ.नलिनीताई कलबुर्गी

सेक्रेटरी
कॉ.युसुफ शेख (मेजर)

हुतात्मा कुर्बान हुसेन अल्पसंख्यांक महिला कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुंभारी, ता. द. सोलापूर.
चेअरमन कॉ.सौ. नलिनीताई कलबुर्गी — सेक्रेटरी कॉ. मुमताज दाऊद शेख

कॉ. मिनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुंभारी, ता. द. सोलापूर.
चेअरमन सौ.यशोदा गजेंद्र दंडी — सेक्रेटरी सौ.विजयालक्ष्मी रा. महेशन

हुतात्मा रेडिमेड व शिलाई कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुंभारी, ता. द. सोलापूर.
चेअरमन कॉ.संदिप रेऊरे — सेक्रेटरी कॉ.विरेंद्र पद्मा

कॉ.मधुकर के. पंधे यंत्रमाग कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुंभारी, ता. द. सोलापूर.
चेअरमन कॉ.लक्ष्मण माळी — सेक्रेटरी कॉ.शंकर गड्डम

जांबमुनी मोची समाज मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कुंभारी, ता. द. सोलापूर.
चेअरमन कॉ.कुर्मय्या म्हेत्रे — सेक्रेटरी कॉ.रवी म्हेत्रे

अधिक माहितीसाठी कार्यालय पत्ता

हुतात्मा कुर्बान हुसेन सोसायटी
१३०, सिध्देश्वर पेठ, शहापुर चाळ, अश्फाक उल्ला खान हॉल, सोलापूर.

दत्त नगर सोसायटी
१७६२, लाल बावटा ऑफिस, दत्त नगर, सोलापूर.

✻ संपर्क :- 9130030043, 9130030047

प्रकल्प विकासक : वसंत विहार रियाल्टी प्रा. लि., सोलापूर.